# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २८/०९/२०२४ (शनिवार)

---

### सुगंधित तंबाखु ,गुटखा,पानमसाला विकणा—यांवर केळवद पोलसांची कारवाई.
### ५६,७६६ रूपयाचा मुददेमाल जप्त,एकाला अटक

पो.स्टे. केळवद :—दि.२६/०९/२०२४ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, केळवद पोलीस स्टेशन हददीत आरोपी विवेक रमेश कुंभरे, वय २२ वर्ष रा. गुंढरी, पो. इंटगाव, ता. पारशिवणी, जि. नागपुर हा सुगंधित तंबाखु ,गुटखा,पानमसाला याची वाहतुक व विक्री करतो. त्यानुसार त्या नुसार केळवद पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि श्री अनिल राउत यांनी दिनांक २६/०९/२०२४ रोजीच अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांना पत्रव्यवहार केला होता. पोलीसांनी मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन दि. २६/०९/२०२४ १७/४५ वा. दरम्यान आरोपी विवेक रमेश कुंभरे, वय २२ वर्ष रा. गुंढरी, पो. इंटगाव, ता. पारशिवणी, जि. नागपुर याला एनएच ५४७ हायवे केळवद या ठिकाणी गाठले. त्यावेळी आरोपी त्याच्या ताब्यातील स्पेडंर मोसा. क्र. एम एच ४० ए बी ९६३० वर थैल्यामध्ये सुगंधित तंबाखु ,गुटखा,पानमसाला मिळुन आला.त्याची चौकशी व विचारपुस केली असता त्याच्या ताब्यात सुगंधित तंबाखु ,गुटखा,पानमसाला इत्यादी वस्तु दिसुन आल्या त्यामुळे पोलीसांनी दोन पंचासमक्ष पंचनामा केला आणि आरोपीच्या ताब्यातुन **सुगंधीत तंबाखु गोल्ड आर जी२/१ कि. ग्रॅम रु ४० नग ६०० रु — किमंत २४,०००/रु २) सुगंधीत तंबाखु रू गोल्ड आर जी २०५०० ग्रॅम रु ०४ जग ३००, /रु किमंत १२००/रु ३) सुगंधीत तंबाखु ब्लैंक लेबल ३० में ०४ नग २२.५० /रु किमंत९०/रु ४) पान मसाला राजश्री १७२.५ ग्रॅम रु ०४ नग २७०/रु किमंत १०८०/रु ५) पान मसाला विमल १२६.५ ग्रॅम रु ०२ जग १९८/रु किमंत—३९६/रु एकूण वजन ४३.०६३ कि.. एकूण किमंत २६,७६६ असा मुददेमाल तसेच आरोपीच्या तब्यातील स्पेंडर मो.सा क्र. एम एच ४० ए बी ९६३० किमंत ३०,००० रू असा एकुण ५६,७६६ रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर सदर माहीती** अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना देण्यात आली त्यामुळे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, नागपूर चे अधिकारी हजर झाले. त्यांनी सुध्दा पंचासमक्ष सदर अवैध मालाची तपासणी केली पंचासमक्ष पंचनामा केला . श्रीमती. एस. व्ही. बाभरे, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या रिपोर्ट वरून **आरोपी नामे—** विवेक रमेश कुंभरे, वय २२ वर्ष रा. गुंढरी, पो. इंटगाव, ता. पारशिवणी, जि. नागपुर याच्या**विरूद्ध पोस्टे केळवद येथे** कलम २२३,२७४,२७५, १२३ भारतीय न्याय संहीता—२०२३**(आदेशाची अवज्ञा, भेसळ)**सहकलम २६ (१), २६(२)(iv) ,२७(३) (e), ३०(२) (ए), अन्न सुरक्षा व मानक अधिनियम—२००६, सहकलम ३(१) (zz)(iv),५९ अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन आरोपी पि.सी.आर मध्ये आहे.पुढील तपास केळवद पोलीस करत आहे.**

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री अनिल म्हस्के उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक अनिल राउत, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अमरदीप कामठे, पोलीस मंगेश झारपुरे,महीला पोलीस हवलदार किरण भगत पोलीस अंमलदार पंकज कोहाळ यांनी पार पाडली.

## कुही हद्दीतील जुगार अडयावर धाड
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

**पो.स्टे. कुही :—दि.** २६/०९/२०२४ चे २२/४० ते २३/३५ वा. पोलीस स्टेशन कुही येथील अधिकारी व अंमलदार हे पोस्टे हद्यीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त सुत्रांकडुन पक्की माहीती मिळाली कि काही इसम मौजा धामना ते निंबा रोड शिवारातील सावजी धाबा येथे तास पत्तेचा खेळ खेळत आहे. त्यानुसार पोलीस तेथे गेले असता त्याना काही लोक ५२ तास पत्यावर पैसाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याचे दिसल्याने पोलीसांनी शिताफीने धाड टाकुन ८ जुगारी इसमांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांची नावे **१) वतन दादाराव राउत वय ३८ वर्ष रा. जुनी बिळीपेठ नागपुर २प्रभाकर चितामन बुरबुरे  वय ५२ वर्ष रा. धामना जि. नागपुर ३) अनेश राजु माळी वय ३४ वर्ष रा. वळद ता. उमरेड जि. नागपुर ४) मोहीत सुरेश बळगत वय २४ वर्ष रा. बिळगाव ता. कामठी जि. नागपुर ५) सुजीत मुन्ना चौव्हान वय २९ वर्ष रा. प्लॉट नं. ४७ श्रीयस नगर हुळकेश्वर जि. नागपुर ६) अश्वजीत विश्वविजयराव महेशगवळी वय २८ वर्ष रा. राजु गांधी नगर न्युव बिळीपेठ जि. नागपुर ७) शीवन सुनिल नाईक  वय २७ वर्ष रा.  राजु गांधी नगर न्युव बिळीपेठ  जि नागपुर ८)शेख रहीमान मुलाम दस्तगीर  वय ४३ वर्ष रा.  हसनबाग बळीमज्जीत जवळ नागपुर जि नागपुर अशी आहे. आरोपीकडुन व घटणास्थळावरून २ पंचासमक्ष मुद्येमाल १) ५२ तासपत्ते  (२) कागदी पॅकीटमधील ठेवलेले ५२  तासपत्ते असलेले पॅकीट एकुन किंमत १५०/—रु २) आरोपिताकडुन अंगझडतीत नगदी एकुन २४,७००/—रु ३)एक टाटा इंडिका  विस्टा कार क्र एमएम २९आर ४३२५ किमत २,००,०००/—रु  ४)३ मोबाईल किमती ३०,०००/—रु असा संपुर्ण एकुन २,५४,८५०/—रु** माल जप्त करण्यात आला. पोहवा/२०७१ हरीदास देविदास चाचेरकर पोस्टे कुही यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे कलम ४, ५. महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक  अधिनियम १८८७ अन्वये वरील ८ आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद. करण्यात आल आहे. पुढील तपास पोउपनि मनोहर गभने पोस्टे कुही मो.नं ९४२३४१३३५२ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्रीमती वृष्टी जैन उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक भानुदास पिदुरकर, यांच्या आदेशान्वये कुही पोलीस सटेशन येथील अधिकारी पोउपनि मनोहर गभने, सफौ संजय कानडे, पोहवा हरीदास चाचेरकर यांनी पार पाडली.

## अकस्मात मृत्यु

**पोस्टे कळमेश्वर :—**यातील मृतक नामे लालु शिवनाथ राम वय ३२ वर्ष रा. खीरनादीह ता जि मुजफ्फरपुर बिहार हा ईतर मजुरांसोबत खुर्सापार बुधला येथील विट भट्टीवर काम करत होता दि. २५/०९/२४ रोजी १८/०० वा. सुमारास मृतक हा **एका ठिकाणहुन दुस—या ठिकाणी विटांची भट्टी लावीत असता, पाणी आल्याने जमीन ओली होती. अचानक विटांची भट्टी मृतकचे अंगावर पडल्याने त्याच्या छातीला मुका मार लागल्याने उपचारकामी सरकारी दवाखना कळमेश्वर नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे ट्रामा अपघात विभाग कॅज्युल्टीमध्ये दि. २५/०९/२४ ला भरती केले असता**, उपचारा दरम्यान दि. २५/०९/२४ चे २३/३० वा. मरण पावला.

सदर प्रकरणात पो.स्टे कळमेश्वर येथे मर्ग नोंद. करण्यात आला आहे. सदर मर्गचा पुढील तपास पोहवा/ १९१८ वानखेडे मोक्र.९९२२७९१९१८हे करीत आहे.

## पारशिवनी हद्यीतील सटट्रापटी जुगार खेळणाऱ्यावर गुन्हा नोंद.
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

**पो.स्टे. पारशिवनी**– दि. २७.०९.२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनागुप्त सुत्रांकडुन पक्की माहीती मिळाली कि काही इसम आंबेडकर चौक पारशिवनी येथे सटट्रापटी जुगार खेळत आहे मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तेथे पोहचले असता त्यांना आरोपी क्र १) विलास गोविंद शेळके वय ४२ वर्ष रा. सावरकर रेसीडेन्सी, पारशिवनी २) प्रेम भोंडेकर रा. भागेमाहेरी ता. पारशिवनी हे सटट्पटी वर आकडे घेतांना मिळुन आले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्यांच्याताब्यातुन २०,७०० रू नगदी, १ मोबाईल १०,००० रू आणि सटट्रापटी साहीत्य कि. ५ रू. असा एकुण ३०,७०५ रू चा माल जप्त करण्यात आला. सपोनि किशोर शेरकी स्था.गु. शा. नागपुर ग्रामीण यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपी क्र १) विलास गोविंद शेळके वय ४२ वर्ष रा. सावरकर रेसीडेन्सी, पारशिवनी २) प्रेम भोंडेकर रा. भागेमाहेरी ता. पारशिवनी यांच्या विरूद्धकलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ४९ भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पारशिवनी पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे यांच्या आदेशान्वये सपोनि किशोर शेरकि, सपोनि मनोज गदादे सपोनि जिवन राजगुरू पोहवा संजय बांते पोना विरेन्द्र नरड पोना विपीन गायधाने आणि चालक पोहवा अमोल यांनी पार पाडली.

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद.

पो.स्टे. केळवद :–दिनांक २८/०९/२०२४ से ०७/३० वा ते ०८/०० वा च्या सुमारास पोलीस स्टेशन केळवद अधिकारी व स्टॉफ सह पोलीस स्टेशन केळवद हद्दीत प्रट्रोलींग करित असतांना अवैधरित्या देशी दारू विक्रीची मुखबीर द्वारे पक्की माहीती मिळाली कि मौजा पारधी बेडा तिडंगी येथे काही इसम अवैधरित्या दारूची विक्री करीत आहे. अश्या माहीतीवरून ठाणेदार सपोनि अनिल राउत पोस्टे स्टाफसह रेड कामी रवाना झाले असता पारधीबेडा तिडंगी येथील **आरोपी क्र १) आरोपी दिलीप संतोष राजपुत वय ४० वर्ष रा पारधी बेडा तिडंगी याच्या ताब्यात १) ०२ नग निळ्या रंगाचे प्लास्टिक ड्रम ज्याचे आत प्रत्येकि २०० लिटर मोहफूल रसायण सडवा असा एकूण ४०० लिटर, प्रती लिटर २०रू असा एकूण ८०००/रु. (२) ३० लिटर तयार मोहाफुल गावठी दारू प्रती ५०/रु. लीटर प्रमाणे असा एकुण कि. १५००/ ३.) निळ्या रंगाचे ३ खाली ड्रम प्रत्येकी १०००/रु प्रमाणे एकुण कि. ३,०००/रु ४)२ नग लोखंडी ड्रम मध्ये मोहाफुल रसायणने भरलेले उकडते रसायण सड़वा प्रतेयेकी १०० लीटर प्रमाणे २०० लिटर प्रती लिटर २०/रु एकुण ४०००/ रु.५) २ नग लोखंडी खाली ड्रम कि. १२००/रु असा एकूण २४००/रु (६) २ टन जळाऊ लाकूड प्रति टन कि २५००/–प्रमाणे ५०००/–रु (७) ईतर दारू गाळण्याचे साहीत्य एकूण ४०००/रु असा एकुण २७९००/रूया मुद्देमाल मिळुन आला व सदर मुद्येमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.आरापी क्र २) महिला आरोपी रा पारधी बेड़ा तिडंगी कळमेश्वर याच्या ताब्यातुन २० लिटर तयार मोहाफुल गावठी दारु प्रती ५०/रु. मीटर प्रमाणे असा एकुण कि १००० चा मुद्येमाल मिळुन आला व सदर मुद्येमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.आरोपी क्र ३) महिला आरोपी रा पारधी बेडा तिडंगी यांच्या ताब्यातुन १ नग निळया रंगाचे प्लास्टिक ड्रम ज्याचे आत प्रत्येकि २०० मिटर मोहफुल रसायन सडवा असा एकुण २०० मिटर, प्रती लिटर २०/रु असा एकूण ४०००/रु. (२) ४० लिटर तयार मोहाफुल गावठी दारू प्रती ८/रु. लीटर प्रमाणे असा एकुण कि. २०००/ रु ३.) निळ्या रंगाचे २ खाली २,०००/ ४)२ नग लोखंडी ड्रम मध्ये मोहाफुल रसायणने भरलेले उकडते २०० लिटर प्रती लिटर २०/रु एकूण ४०००/ रु.५)२ नग लोखंडी खाली ड्रम प्रत्येकी १००/रु प्रमाणे एकुण कि. रसायण सडवा प्रत्येकि १०० लीटर प्रमाणे इम कि. १२००/रू असा एकुण २४००/रु (६) ३ टन जळाऊ लाकुड प्रति टन कि २०००/रु–प्रमाणे ७५००/–रु (७) ईतर दारू गाळण्याचे साहीत्य एकुण ४०००/रु असा एकुण २५९००/रू चा मुद्देमाल मिळुन आला व सदर मुद्येमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आरोपी क्र ४) महिला आरोपी रा पारधी बेडा तिडंगी यांच्या ताब्यातुन १एका**

हिरव्या रंगाचे प्लॉस्टीक डबकीमध्ये ३० लिटर मोहाफुल गावठी दारू प्रती लीटर ५०/ रू चा मुद्देमाल **मिळुन आला व सदर मुद्येमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आरोपी क्र ५** महिला आरोपी रा पारधी बेडा तिडंगी यांच्या ताब्यातुन एका काळ्या रंगाचे रबरी ट्युब मध्ये ३० लिटर मोहाफूल गावठी दारू प्रती लीटर ५०/ रु **प्रमाणे** एकुण १,५००/ रु चा माल **मिळुन आला व सदर मुद्येमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आरोपी क्र १ दिलीप** संतोष राजपुत वय ४० वर्ष रा पारधी बेडा तिडंगी आणि ४ महिला आरोपी **यांच्या विरूध्द केळवद पोलीस स्टेयान येथे वेगवेगळे ५ गुन्हे दाखल करण्यात आले. आहे. सर्व कारवाई मध्ये एकुण ५६३५०/— रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री अनिल म्हस्के उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक अनिल राउत, पोउपनि विलास गेडाम ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अमरदीप कामठे, सफौ ठाकरे, परमार पोहवा मंगेश झारपुरे,महीला पोलीस हवलदार किरण भगत नापोअ दिलीप इंगळे चालक पोहवा साठवणे चालक पोलीस अंमलदार राहुल यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**